**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - 18**

**फ प्रभाग समिती**

**सभावृत्तांत ( कार्यपत्रिका क्रमांक 02)**

**दिनांक : 24/11/2021** **वेळ : सकाळी 11.30 वा .**

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या फ क्षेत्रीय कार्यालयाची मासिक सभा बुधवार दि.24/11/2021 रोजीची सकाळी 11.30 वाजता फ क्षेत्रीय कार्यालयातील " **राजर्षी शाहू महाराज सभागृह** " येथे आयोजित करणेत आली होती. सदर सभेस खालील सन्मा. सदस्य/सदस्या उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| 1. | मा. कुंदन अंबादास गायकवाड | सभापती |
| 2. | मा.योगीता ज्ञानेश्वर नागरगोजे | सदस्या |
| 3. | मा.पौर्णिमा रविंद्र(आप्पा) सोनवणे | सदस्य |
| 4. | मा.संगिता (नानी) प्रभाकर ताम्हाणे | सदस्या |
| 5. | मा. घोलप कमल अनिल | सदस्य |
| 6. | मा.पवळे सुमनताई मधुकर | सदस्या |
| 7. | मा.चिखले सचिन तुकाराम | सदस्य |
| 8. | मा.संतोष भाऊसाहेब मोरे | स्वीकृत सदस्य |

याशिवाय मा.श्री.सिताराम बहुरे–क्षेत्रीय अधिकारी, श्री.विजयकुमार काळे–कार्यकारी अभियंता (स्थापत्य), मा.संजय खाबडे-कार्यकारी अभियंता विद्युत), मा.किशोर महाजन-कार्यकारी अभियंता झोनिपु(स्थापत्य), मा.महेंद्र चौधरी-प्रशासन अधिकारी तथा सचिव,मा. शिवाजी लोखंडे-लेखाधिकारी, मा.सुनिल हरिदास- उप अभियंता (झोनिपु स्थापत्य), श्री विजयकुमार शिंदे-उपअभियंता (जलनि:स्सारण),मा.शेखर गुरव-उपअभियंता (PMAY/ नगररचना), मा.सुधीर वाघमारे-प्रभारी सहा. आरोग्य अधिकारी,श्रीमती जयश्री देविदास गिरमे-उदयान अधिकारी, श्री चंद्रकांत सुभाष गोडसे-सहा. उदयान अधिकारी, श्री इदनानी नरेशकुमार-कार्यालय अधिक्षक, श्री स्वामीजंगम जी.डी.-कनिष्ठ अभियंता(जलनि:स्सारण), श्री कुलकर्णी ए.ए..-कनिष्ठ अभियंता(पाणी पुरवठा) श्री सी.जी.कुर्ले-कनिष्ठ अभियंता(पाणी पुरवठा ), श्री लांडगे सतिश निवृत्ती-अतिक्रमण निरिक्षक, श्री कोटीयाना डी.एम.-आरोग्य निरिक्षक (पशुवैद्किय विभाग), श्री आढळे डी.एम.-उद्यान निरिक्षक, श्री एस.डी.रावते-सहा. हॉर्टीकल्चर सुपरवायझर, बी.व्ही. सगरे उदयान सहाय्यक इ.अधिकारी /कर्मचारी उपस्थित होते.

मा. सभापती, कुंदन अंबादास गायकवाड यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत करुन सभेची सुरुवात करणेस अनुमती दिली.

दिनांक १४/१०/२०२१ रोजी स.११.३० वा. झालेल्या फ प्रभाग समितीच्या मासिक सभेचा सभावृत्तांत (कार्यपत्रिका क्रमांक ७) कायम करणेत येत असलेचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

दिनांक २९/१०/२०२१ रोजी दु.१२.४० वा. झालेल्या फ प्रभाग समितीच्या विशेष सभेचा(सभापती निवड ) सभावृत्तांत (कार्यपत्रिका क्रमांक १) कायम करणेत येत असलेचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

(कृ.मा.प.)

मा.सभापती व उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालीलप्रमाणे ऐनवेळचे विषय सभेत दाखल करुन घेणेत आले.

**विषय क्रमांक १**-सन्मा.सदस्या कमलताई अनिल उर्फ बापू घोलप यांचा दिनांक २४/११/२०२१ रोजीचा प्रस्ताव.

फ प्रभाग समिती सदस्य व अधिकारी यांचा इंदौर येथे अभ्यास दौरा आयोजित करणेबाबत.

स्वच्छ भारत अभियान अंतर्गत इंदौर शहराचा सन २०२१ मध्ये भारतामध्ये पहिला क्रमांक आलेला आहे. तेथील महानगरलिकेमार्फत स्वच्छतेबाबत राबविलेल्या उपाययोजना व प्रकल्प तसेच इतर प्रकल्प पाहणी करुन तेथील चांगल्या उपाययोजना व प्रकल्प या महानगरपालिकेमध्ये राबविलेस शहराचे नाव लौकिकात भर पडेल. तरी फ प्रभाग समिती सदस्य व ४ अधिकारी/कर्मचारी यांचा मध्य प्रदेशमधील इंदौर येथे अभ्यास /पाहणी दौरा आयोजित करणेस व त्यास प्रत्यक्ष होणा-या खर्चास मान्यता देणे.

**विषय क्रमांक २** -सन्मा.सदस्या पौर्णिमा रविंद्र(आप्पा) सोनवणे यांचा दिनांक २४/११/२०२१ रोजीची प्रस्ताव.

रुपीनगर येथील छत्रपती शिवाजी महाराज प्रवेशद्वारालगत असलेली मुतारी पडीक झाली असून योग्य वेळी तेथील साफ सफाई न झाल्यामुळे तेथे अतिशय दुर्गंधी पसरली आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या कमानीजवळ अशी मुतारी असणे योग्य नाही अशा प्रकारच्या प्रतिक्रिया आम्हाला नागरिकांकडून सतत येत असतात. तरी सदर ठिकाणची मुतारी पाडून ती आतल्या बाजूला स्थलांतर करणेचे प्रस्तावास मान्यता देणे.

वरीलप्रमाणे ऐनवेळचे विषय दाखल करुन घेणेत आले.

---

विषय क्रमांक-१<br>
दिनांक-२४/११/२०२१<br>
सूचक-संगिता ताम्हाणे

ठराव क्रमांक-२<br>
विभाग- सन्मा.सदस्यांचा प्रस्ताव<br>
अनुमोदक-योगीता नागरगोजे

संदर्भ- सन्मा.सदस्या कमलताई अनिल उर्फ बापू घोलप यांचा दिनांक २४/११/२०२१ रोजीचा प्रस्ताव.

स्वच्छ भारत अभियान अंतर्गत इंदौर शहराचा सन २०२१ मध्ये भारतामध्ये पहिला क्रमांक आलेला आहे. तेथील महानगरलिकेमार्फत स्वच्छतेबाबत राबविलेल्या उपाययोजना व प्रकल्प तसेच इतर प्रकल्प पाहणी करुन तेथील चांगल्या उपाययोजना व प्रकल्प या महानगरपालिकेमध्ये राबविलेस शहराचे नाव लौकिकात भर पडेल. तरी फ प्रभाग समिती सदस्य व ४ अधिकारी/कर्मचारी यांचा मध्य प्रदेशमधील इंदौर येथे अभ्यास /पाहणी दौरा आयोजित करणेस व त्यास प्रत्यक्ष होणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा विषय सर्वानुमते मान्य करणेत आला.

---

विषय क्रमांक-२
दिनांक-२४/११/२०२१
सूचक- पौर्णिमा सोनवणे

ठराव क्रमांक-३
विभाग- सन्मा.सदस्यांचा प्रस्ताव
अनुमोदक-योगीता नागरगोजे

संदर्भ-सन्मा.सदस्या पौर्णिमा रविंद्र(आप्पा) सोनवणे यांचा दिनांक २४/११/२०२१ रोजीची प्रस्ताव.

रुपीनगर येथील छत्रपती शिवाजी महाराज प्रवेशद्वारालगत असलेली मुतारी पडीक झाली असून योग्य वेळी तेथील साफ सफाई न झाल्यामुळे तेथे अतिशय दुर्गंधी पसरली आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या कमानीजवळ अशी मुतारी असणे योग्य नाही अशा प्रकारच्या प्रतिक्रिया आम्हाला नागरिकांकडून सतत येत असतात. तरी सदर ठिकाणची मुतारी पाडून ती आतल्या बाजूला स्थलांतर करणेचे प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा विषय सर्वानुमते मान्य करणेत आला.

---

तद्नंतर मा.कुंदन अंबादास गायकवाड, सभापती यांनी सर्व उपस्थित सन्मा. सदस्य, पदाधिकारी / अधिकारी यांचे आभार मानून प्रस्तुतची सभा संपल्याचे जाहीर केले.

K.A Gaikwad

(कुंदन अंबादास गायकवाड)
सभापती
फ प्रभाग समिती
निगडी- 44

क्रमांक- फक्षेका/सभा/कावि/78 /2021 दिनांक- 29 /11/2021

(महेंद्र चौधरी)
प्रशासन अधिकारी
तथा सचिव, सभा शाखा
फ प्रभाग समिती,
निगडी-44

प्रति,
सर्व संबंधित ----------------------